# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/08/2023 (सोमवार) दुपार

---

## दुखापत

१) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत खदान नं ०३ मडीबाबा मंदीर जवळ कन्हान येथे दि. ०६/०८/२०२३ चे २१/०० वा. ते २१/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सर्वेश श्रिमाताप्रसाद पटेल, वय २० वर्ष, रा. बारेमलका ता. सिरातु जि. कौशांबी राज्य उत्तरप्रदेश ह. मु. खदान नं. ०३ कन्हान मडी बाब मंदीर के पास हा खदान नं. ०३ कन्हान येथे आपल्या नातेवाईकाकडे आला असता दिनांक ०६/०८/२०२३ चे रात्री ०९/०० वा. दरम्यान फिर्यादी हा बाथरुम करण्यासाठी घराच्या बाहेर गेला व वापस घरी येत असता आरोपी नामे— चिंटु सिंग, रा. खदान नं. ०६ कन्हान हा तिथे उभा होता व त्याचे सोबत तिन चार मुले होते त्यांचे आपसात भांडण सुरु होते त्यापैकी चिंटु सिंग याने कोणतेही कारण नसतांना फिर्यादीच्या डोक्यावर कोणत्यातरी वस्तुने मारुन जखमी केले व शिवीगाळी देवुन मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रशांत रामटेके ब. नं. १५७६ मो. नं. ९६३७७६७१७६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत १५ किमी अंतरावर बाजार चौक सावरगाव येथे दिनांक ०५/०८/२०२३ चे १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— महादेव गुलाबराव रेवतकर, वय ६४ वर्ष, रा. सावरगाव वार्ड क्र. २ ता. नरखेड हा बाजार चौक सावरगाव येथे रस्त्याने जात असता **आरोपी नामे— संजय मारोतराव काळबांडे, रा. सावरगाव वार्ड ता. नरखेड** याने त्यास काऱ्या कोठे चालला असे म्हणुन चिडविले असता फिर्यादीने त्यास हटकलेवरुन आरोपीने फिर्यादीस हातबुक्कीने मारपीट करुन शिवीगाळ केली व हातात गोटा घेवुन गोटा डोक्याचे मागे मारुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भुजंग बन्सोड ब. नं. २९५ मो. नं. ९९२३१४४२९५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर